सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर

E-mail :-chandrapur.rdc@gmail.com फोन नं. 07172 – 251597

पत्रक्र. कावि/आ.व्य./कोविड विषाणू/2021/541 दिनांक -२। एप्रिल, 2021

SVAMC
IW No. 327
Date. 23/04/2021

**वाचा:**- 1. साथरोग अधिनियम 1897.

2. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, कलम 33, 34, 51, 56, 57, 58, 63 व 65.

**संदर्भ:** जिल्हा शल्यचिकित्सक, चंद्रपूर यांचे पत्र क्र. जिरुचं/कोविड 19/को.रू./6432/2021 दिनांक : 21/04/2021

## आदेश

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी साथरोग अधिनियम 1897, दिनांक 13 मार्च 2020 पासुन लागु करून खंड 2,3 व 4 मधील तरतुदींनुसार अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. त्यान्वये जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात कोविड-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

जिल्ह्यात कोविड-19 आजाराच्या दुस-या लाटेत कोविड-19 बाधित रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. तरी कोविड-19 आजाराची गंभीर परिस्थिती पाहता रुग्णांकरीता खाटांची कमतरता भासत आहे. त्यामुळे खाटांची संख्या तात्काळ वाढविण्याची आवश्यकता आहे. तसेच, बाधित रुग्णांच्या औषध-उपचाराकरिता 'डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC)' उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक यांनी संदर्भीय पत्रानूसार प्रस्तावित केल्याप्रमाणे विमलादेवी आयुर्वेदिक मेडीकल कॉलेज आणि रूग्णालय,वांढरी, ता.चंद्रपूर हे रूग्णालय 23 खाटांसह ($O_2$ Bed-23) 'डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC)' म्हणून कार्यान्वित करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

1. भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद (ICMR),भारत सरकार यांनी कोविड १९ आजाराबाबत वेळोवेळी औषध उपचारा करीता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना अधिनियम, नियमावलीच्या आधारेच कोविड बाधित रुग्णांचा उपचार करणे बंधनकारक राहील.
2. कोविड १९ आजारे बाधित रुग्णांची Medico Legal Policy च्या आधारे उपचार करणे अपेक्षित राहील.
3. भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद (ICMR), राज्यशासन आणि आरोग्य विभाग यांच्या कोविड बाधित रुग्णांना प्रवेश देणे,उपचार करणे व डिस्चार्ज करणे संबधी मार्गदर्शक सुचानांचे पालन करणे आवशक राहील.
4. कोविड १९ रुग्णांन करीता पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी व स्टाफ उपलब्ध ठेवून Bombay Nursing Registration Act (Amendment Act),2006 नुसार कार्यवाही करणे बंधनकारक आहे.
5. कोरोना बाधित रुग्णांच्या उपचारार्थ सर्व यंत्रणा, आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध ठेवणे आवश्यक राहील. रुग्णालयाने Central Oxygen Pipeline ची प्रणाली बसून घेणे आवश्यक आहे. तसेच Ventilator ची सुविधा व Critical रुग्णावर उपचाराची सुविधा अद्यावत ठेवावीत. DCHC आणि DCH रुग्णालयांमध्ये प्रत्येक बेडला Monitor व Pulse Oxymeter ची व्यवस्था असावी आणि वेळोवेळी भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद (ICMR), राज्यशासन आणि आरोग्य विभाग यांच्याकडून प्राप्त दिशानिर्देशांचे पालन करावे.
6. कोरोना बाधित रुग्णांची काळजी घेणे, एका वार्डातून दुसऱ्या वार्डात स्थलांतर करणे याकरीता प्रशिक्षित मनुष्यबळ ठेवावे तसेच PPE कीट वापरानंतर ती व्यवस्थित BMW च्या मानकानुसार नष्ट करण्याची जबाबदारी ही सदर रुग्णालयांची असेल.

7. सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शक सूचनेनुसार, अनुभवी डॉक्टर्स, नर्स, पॅरामेडीकल स्टाफ आवश्यक संख्येनुसार उपलब्ध ठेवावे व त्यांनी N- 95 मास्क, हॅंडग्लोज यांचा वापर करावा तसेच आयसोलेशन वार्डात कार्यरत सर्व संबंधित डॉक्टर्स व कर्मचारी यांनी PPE कीट वापर करणे बंधनकारक राहील याची संचालक, उपरोक्त नमूद खाजगी रुग्णालय यांनी वेळोवेळी शहानिशा करावी. तसेच, कोविड रुग्णालयात नेमणूक करण्यात आलेले अनुभवी डॉक्टर्स, नर्स, पॅरामेडीकल स्टाफ यांची यादी ही प्रशासनास पुरवावी.
8. आयसोलेशन वार्ड व संपूर्ण रुग्णालयचे Sodium Hypochlorite चा वापर करून दिवसातून किमान दोनदा व आवश्यकतेनुसार निर्जंतुकीकरण करावे.
9. रुग्णालयामध्ये भर्ती होणारे कोविड १९ बाधित रुग्ण, डिस्चार्ज होणारे रुग्ण व मृत होणारे रुग्ण याबाबतचा दैनंदिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर ,जिल्हा शल्यचिकित्सक, चंद्रपूर व जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर/IDSP यांना गोपनीय स्वरुपात देणे बंधनकारक राहील. तसेच कोविड १९ पोर्टल व ICMR मध्ये Data Upload करण्याची जबाबदारी ही सदर रुग्णालयाची राहील व त्याकरीता रुग्णालयातील सक्षम कर्मचाऱ्यांकडे सदर जबाबदारी सोपविण्यात यावी. तसेच, सक्षम कर्मचारी यांचे संपूर्ण नाव व मोबाईल क्रमांक या कार्यालयास कळविण्यात यावे. त्याचप्रमाणे, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे दैनंदिक ऑसिजन पुरवठ्याबाबतची माहिती दररोज सकाळी सादर करावी.
10. रुग्णालयात कोविड १९ आजाराने बाधित रुग्णाच्या उपचाराकरीता किमान एक पूर्णवेळ औषध वैद्यकशास्त्र विशेषज्ञ Physician उपलब्ध करण्यात यावा. याव्यतिरिक्त, दोन Physician on Call रुग्णालयात उपलब्ध असावेत.
11. एखादया कोविड बाधित रुग्णाचा उपचार दरम्यान मृत्यु झाल्यास मृतकाच्या शरीराची विलेव्हाट ही केंद्रशासन, ICMR, राज्यशासन, आरोग्य विभाग यांनी निर्गमित केलेल्या नियमावली नुसार करण्यात यावी.
12. सदर आदेश पुढील ६ माहिन्यापर्यंत लागू राहील, परंतु कोविड बाधित रुग्णाच्या उपचारामध्ये सुधारणा न झाल्यास किवा उपचारातंर्गत काही गुंतागुंत निर्माण झाल्यास कोणत्याही क्षणी सदर आदेश रद्द करण्यात येईल.
13. नॉन कोविड आणि कोविड १९ रुग्णांच्या एन्ट्री आणि एक्झीट करीता स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.
14. रुग्णालयात उपलब्ध /रिक्त खाटांची संख्या रुग्णालयांचे दर्शनीय भागात दररोज लावावी.
15. रुग्णांस कुठल्याही अग्रीम (अडव्हान्स) शुल्काची मागणी /आकारणी करण्यात येऊ नये.
16. पैशाअभावी रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यास नाकारु नये.
17. रुग्णालयात रुग्ण दाखल झाल्यानंतर रुग्णांना ऑक्सीजनची गरज असलेल्या रुग्णांना ऑक्सीजन बेड उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच लक्षणे नसलेल्या रुग्णांना सामान्य बेड देण्यात यावे.
18. उपचार करण्यापूर्वी रुग्णांचे नातवाईकांची संमती घेण्यात यावी.
19. रुग्णालयातील ऑक्सीजन साठा महिनाभर उपलब्ध राहील, याबाबत नियोजन करण्यात यावे. तसेच ऑसिजन साठा व पुरवठा सबंधित नियोजानाकरीता तांत्रिक सल्लागार यांच्यासमवेत रुग्णालयाने करारनामा करण्यात यावा. जणेकरून, रुग्णांना हा ऑसिजन पुरवठा सुरळीत मिळेल याची खात्री होईल.
20. परवानगी मिळालेल्या रुग्णालयाने ऑक्सीजन बेड उपलब्ध करुन ठेवण्यात यावे. त्यानंतर डी. सी.एच. सी. मध्ये दाखल केलेल्या रुग्णांना व्हेंटिलेटरची आवश्यकता पडल्यास त्याच ठिकाणी त्याचा उपचार करण्यात यावा.
21. गंभीर अवस्थेत असलेल्या रुग्णांना संदर्भीत करु नये तसेच संदर्भीत करावयाचे असल्यास बेड उपलब्ध असल्याची खात्री करुन घ्यावी.

22. Inj. Remdesivir, inj. methylpredinisolon, inj. LMWH & Tab Fivipiravir 200 mg व ईतर आवश्यक औषधी साठा उपलब्ध ठेवण्यात यावे व याची संपूर्ण जबाबदारी हि संबंधित रुग्णालयाची असेल.
23. डि.सी.एच.सी. /डि.सी.एच. /८०:२० मान्यता प्राप्त रुग्णालयांनी बाह्य रुग्ण विभाग (ओपीडी) बंद करू नये व ओपीडी ची वेळ निश्चित करुन त्यानुसार सूचना फलक लावण्यात यावा. तसेच नॉन कोविड रुग्णांना सुदधा सेवा देण्यात यावी.
24. ॲंटीजेन नेगेटीव्ह आलेल्या परंतु एच. आर. सी.टी.स्कॅन मध्ये कोविड सदृश्य लक्षणे असलेल्या रुग्णांना संशयित समजून रुग्णालयातील बेड राखीव ठेवावे. तसेच आर.टी.पी.सी.आर. चाचणी करीता नमुने (सॅम्पल) पाठविण्यात यावे. व तोपर्यंत उपचार सुरु ठेवण्यात यावे.जर आर.टी.पी.सी.आर. पॉझीटीव्ह आल्यास रुग्णांना कोविड वार्ड मध्ये Shift करावे. जर आर.टी.पी.सी.आर.अहवाल निगेटीव्ह आल्यास व एच. आर. सी.टी.स्कॅन मध्ये कोविड सदृश्य लक्षणे असल्यास त्यांना उपचार नाकारु नये.
25. सर्व मान्यताप्राप्त रुग्णालयानी किमान दोन व्हेंटीलेटर उपलब्ध करुन ठेवण्यात यावी व रुग्ण गंभीर झाल्यास त्यांच्यावर उपचार सुरु करण्यात यावे.
26. चंद्रपूर शहर महानगर पालिका,चंद्रपूर/शहर नगर पालिका/ तालुका स्तरावरील प्रशासनाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या लेख परिक्षकास (ऑडीटर) कोविड १९ करीता मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयाकडून कोविड १९ रुग्णाच्या उपचाराकरीता आकारण्यात येणाऱ्या देयकांचे लेखापरीक्षण करण्याकरीता संपूर्ण सहाय्यता करणे रूग्णालयास बंधनकारक राहील.
27. लक्षणे नसलेल्या पॉझीटीव रुग्णांना शक्यतो भर्ती करू नये व त्यांची आरोग्य स्थिती सामान्य असल्यास त्यांना कोविड केअर सेंटर CCC मध्ये दाखल करण्याकरीता मार्गदर्शन करावे.
28. Notification No. CORONA- 2020/C.R.97/Aro-5 Public Health Department Dated-२१ May 2020 and extended Notification Dated 27/02./2021(valid from 15.02.2020 to till 31.05.2021) नुसार Annexure-C मध्ये दर्शविलेल्या दरांचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे असेल तसेच त्यापेक्षा जास्ती दर रूग्णालयाने आकारू नये.

| Package | Rate in INR per day | Inclusion | Exclusion | Patient Condition |
|---|---|---|---|---|
| Charges for Routine ward +Isolation | 2000 | Same as per Annexure C | Same as per Annexure C | *Patient admitted but not on O2 support* |
| Charges for Routine ward +Isolation | 4000 | | | *patient on O2 support* |
| Charges for ICU without Ventilator +Isolation | 7500 | | | *Patient on High Flow and Bipap support* |
| Charges for ICUwith Ventilator+Isolation | 9000 | | | *Patient on Ventilator Support* |

29. तसेच सदर रुग्णालयाने, परवानगी देण्यात आलेल्या खाटांच्या संख्येएवढेच रुग्ण आपल्या रुग्णालयात भर्ती करावेत व यापेक्षा जास्त रुग्ण भर्ती करू नयेत.
30. सदर रुग्णालयात ऑसीजन पुरवठा रुग्णास सुरळीत व्हावा याकरीता किमान १० Manifold प्रणालीची व्यवस्था ही सदर रुग्णालयाने तत्काळ कार्यान्वित करणे गरजेचे आहे.

31. सदर रूग्णालयाने Central Oxygen Pipeline प्रणाली, आवश्यक जंम्बो सिलेंडर ची संख्या व बॉम्बे नसिंग होम ॲक्ट सर्टिफिकेट मधील वाढीव खाटांची नोंद व इतर आवश्यक बाबींची पूर्तता केल्यावरच सदर आदेश लागु होईल. DCHC म्हणून परवानगी दिलेल्या उपरोक्त रूग्णालयांनी त्यांचे रूग्णालयाला लागणा-या Liquid Oxygen चा पुरवठा आपले जबाबदारीवर व जिल्ह्याचे बाहेरून उपलब्ध करून घ्यावा. अविरत Liquid Oxygen उपलब्ध राहील याची खात्री केल्याशिवाय रूग्णांना दाखल करून घेऊ नये.

-स्वा-

**(अजय गुल्हाने, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**प्रति,**

1. संचालक, विमलादेवी आयुर्वेदिक मेडीकल कॉलेज आणि रूग्णालय, वांढरी, ता.चंद्रपूर

**प्रतिलिपी:** माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषित

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
2. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
3. उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर
4. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रूग्णालय, चंद्रपूर
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. तहसिलदार, चंद्रपूर
7. वैद्यकीय अधिकारी-आरोग्य, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
8. तालुका आरोग्य अधिकारी, चंद्रपूर

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**